**नियमित दिवाणी दावा क्र. १९९/२०२० मधील**
**निशाणी ५९ वरील आदेश**
**( मनिषा तुकाराम मोरे वि. कासाबाई पांडुरंग पवार)**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की प्रतिवादी क्र. १ ही मयत पांडुरंग पवार यांची रखेल होती व आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ हिला दावा मिळकतीत काहीही हक्क प्राप्त होत नाही. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ७ ला करुन दिलेले खरेदीपत्र वादीच्या दावा मिळकतीतील हिस्स्यावर बंधनकारक नाही. हा सर्व मजकूर दाव्यात नमूद करण्यास वादीने परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र. ७ यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की वादीने मागितलेली दुरुस्ती ही प्रतिवादी क्र. ७ यांनी कैफियत दाखल केल्यानंतर मागितलेली आहे. या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**कारणमिमांसा**

मुद्दा क्र.१ व २ करीता –

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर न्यायालय वाद कथनांत सुधारणा करण्याची मुभा देऊ शकते. परंतु अशा सुधारणा केवळ पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याकरिता आवश्यक असतील तर न्यायालय अशा सुधारणांना परवानगी देऊ शकते. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्यात ज्या सुधारणा करण्याची परवानगी मागितली आहे त्या सुधारणा वादी व प्रतिवादींमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्याकरिता आवश्यक आहेत का हे पाहणे गरजेचे ठरते.

७. वादीने अर्जात जी दुरुस्ती मागितली आहे ती प्रतिवादी क्र.१ व मयत पांडुरंग पवार यांच्यातील नातेसंबंधाबाबत आहे. प्रतिवादी क्र. १ व मयत पांडुरंग पवार यांच्या नातेसंबंधांचा उल्लेख दाव्यात झाला तरी दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादी क्र. १ चा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही असे वादीचे दाव्यात देखील कथन आहे. प्रस्तुत अर्जातदेखील वादीचे असेच कथन आहे की प्रतिवादी क्र. १ ही मयत पांडुरंग पवार यांची रखेल असल्याने तिला दावा मिळकतीत काहीही हक्क प्राप्त होत नाही. त्यामुळे वादी दाव्यातील

कथनांच्या विरोधात कोणतीही दुरुस्ती प्रस्तुत अर्जाद्वारे मागत नाही आहे. वादीस ही दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात आली तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण दाव्यात झालेल्या दुरुस्तीबाबत प्रतिवादीला त्याची कैफियत देण्याचा अधिकार आहे. या सर्व मुद्दयांचा विचार करता मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीने प्रतिवादी याला रक्कम रुपये ५००/– द्रव्यशुल्क देण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

PRAJKTA RAJIV SABNIS
Digitally signed by PRAJKTA RAJIV SABNIS
Date: 2022.04.28 15:55:06 +05'30'

कडेगांव
दिनांक : २८/०४/२०२२

**(प्राजक्ता रा. सबनीस)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव